# रूम टू रीड
# बालसाहित्य पुरस्कार
## 2025

## नामकनं करण्यासाठी सूचना

### रूम टू रीड टीचर-लायब्रेरियन च्वाइस अवार्ड – मराठी

**2025 या वर्षात, रूम टू रीड आपला बालसाहित्य पुरस्कार पुन्हा घेऊन आली आहे.**
आपल्या तिसऱ्या वर्षात, बालसाहित्याच्या क्षेत्रात हा पुरस्कार गुणवत्तापूर्ण साहित्यिक प्रयत्नांचा उत्सव साजरा करणे चालू ठेवेल. या पुरस्कारची कल्पना ही मुख्यत: भारतीय भाषांमधे बालसाहित्यात योगदान देणाऱ्या लेखक आणि प्रकाशकांसाठी असणाऱ्या पुरस्कारांच्या कमतरतेला भरून काढण्यासाठी केली गेली आहे.

टीचर-लायब्रेरियन च्वाइस अवार्ड चा उद्देश बालसाहित्यातील त्या पुस्तकांना मान्यता देणे आहे ज्याला शिक्षक आणि ग्रंथपालांनी बालकांच्या वाचनाच्या रुचीला पूर्ण करण्यासाठी सर्वोत्तम मानले आहे. हा पुरस्कार वाचनालय / शालेय वर्गाच्या सेटिंग मध्ये सर्वात लोकप्रिय बालसाहित्याला दरवर्षी दिला जातो, ज्यामुळे बालसाहित्याच्या भूमिकेला उत्तेजन देता येईल. तसेच शिक्षक आणि ग्रंथपाल, जे पुस्तकांच्या उपयोगीतेतले प्राथमिक घटक आहेत त्यांना सशक्त बनविता येईल.

मागील दोन वर्षाप्रमाणेच, रूम टू रीड, प्रकाशकांकडून दोन वयोगटामध्ये (3 ते 8 वर्ष आणि 8 ते 12 वर्ष) सर्वात जास्त विकली गेलेली मराठी भाषेतील पुस्तकांना नामांकन करण्यासाठी आमंत्रित करत आहे. सूचना आणि मानके खालील प्रमाणे आहेत.

- नामांकन केलेली पुस्तके दोन वयोगटापैकी एका गटासाठीची असावीत. 3 ते 8 वर्ष किंवा 8 ते 12 वर्ष.
- नामांकन केलेली पुस्तके मुळ मराठीतील असावीत किंवा इतर भारतीय भाषा किंवा इंग्रजीतून रूपांतरित किंवा अनुवादित असावीत.
- नामांकन केलेली चित्र पुस्तके ( 60% पेक्षा जास्त सचित्र पानांची ) असावीत.
- ही पुस्तके 2016 -2021 या कालावधीत प्रकाशित किंवा पुनर्मुद्रित झालेली असावीत.
- पुस्तकांच्या लोकप्रियतेचा अंदाज लावण्यासाठी, आम्ही प्रकाशकांना या अवधीतील म्हणजे 31 डिसेंबर 2024 पर्यंतचा ‘विक्रीचा आकडा’ नोंद करण्यास सांगत आहोत.

* 12 वर्षांपेक्षा जास्त वयोगटाच्या मुलांसाठीची किंवा वयस्क वयोगटासाठीची पुस्तके पाठवू नयेत.
* 2016 पूर्वीची पुनर्मुद्रित पुस्तके पाठवू नयेत.
* कुठल्याही विदेशी भाषेतून मराठीत अनुवादित झालेली पुस्तके जमा करू नयेत.

**पुस्तकाचे नामांकन करण्यासाठी इथे क्लिक करा**: https://shorturl.at/QLyTc

नामांकनाची एक छोटी सूची तयार केली जाईल, आणि सरकारी शाळेतील शिक्षक आणि ग्रंथपाल आमच्या वेबसाइट वर आपल्या आवडीच्या पुस्तकासाठी मत देतील.
प्रकाशक प्रत्येक वयोगटात जास्तीत जास्त पाच नामांकने करू शकतील.

**नामांकनाची अंतिम तारीख: 30 एप्रिल 2025!**

अधिक माहितीसाठी आम्हाला *RTR.IndiaAwards@roomtoread.org* वर संपर्क करा.